आर.सी.एस. नं.३२/२०१२

<u>नि.११० खाली आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे वादी नं.३ चे वारस ३अ ते ३ड यांना दाव्यात सामील करुन घेण्यासाठी केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, वादीने सदरचा दावा ठरावासाठी आणि निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना वादी क्रं ३ कै.श्री सुरेश सोनबा वीर हे दि. ०२/०३/२०२२ रोजी मयत झाले आहेत व त्यांना ३अ ते ३ड हे वारस आहेत. सदर वारसांना दाव्याचे कामी सामील करुन घेणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यांना दाव्याचे कामी सामील करुन न घेतल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तथापि सदरील वारसांना दाव्याचे कामी सामील करुन घेतलेस न्यायदानाच्या प्रक्रियेस मदत होणार आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादीने योग्य तो आदेश होणेची विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द ठरावासाठी आणि निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना वादी क्रं ३ कै.श्री सुरेश सोनबा वीर हे दि.०२/०३/२०२२ रोजी मयत झाले आहेत व त्यांना ३अ ते ३ड हे वारस आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता सदरचा दावा गुणदोषावर निर्णायक करण्याकरीता अर्जामधील नमूद नमुद वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करणे जरुरीचे आहे. वादीचा अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. या ठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे आहे की, प्रस्तुत वादी नं ३ चे वारस अभिलेखावर घेण्याकरिता कोणताही कायदेशीर बाध नाही. त्यामुळे न्यायाचे उद्दीष्ट ध्यानात घेवून सदरचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-२२, नियम-३ प्रमाणे सदरचा दावा वादी नं ३ चे वारसांना चालविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.३अ ते ३ड यांना याकामी वादी नं.३ चे वारस म्हणून सामील करणे उचित होईल. वरील सर्वबाबी व परिस्थितींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.११०) मंजूर करण्यात आला.

२. वादीने दावा दुरुस्त करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसांमध्ये दाखल करावी.

(ह.उ.उ.पाटील)

दिनांक : ०४/०८/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, भोर जि.पुणे.